# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/03/2024 (सोमवार) सकाळ

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक १०/०३/२०२४ रोजी चे रात्री २०/०० दरम्यान पो. स्टे. मौदा हद्दीत स्टाफसह अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना एक दहा चक्का ट्रक क्र. MH-40/BG- 3192 मधून अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने चिंचोली गावाचे समोर महामार्गाकडे जाणाऱ्या रोडवर नाकाबंदी दरम्यान ट्रकला थांबवून पाहणी केली असता ट्रक क्र. MH-40 /BG-3192 मध्ये ३२ गोवंशिय जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने ट्रक चालक व वाहक यांना ताब्यात घेऊन त्यांचे ताब्यातून ३२ गोवंशिय जनावरे किंमती १,६४,०००/— रुपये व ट्रक १०,००,०००/— असा एकूण ११,६४,०००/— रू चा माल जप्त करण्यात आला असून सदर ट्रक मधील गोवंशिय जनावरांना योग्य व्यवस्थापनार्थ ज्ञान फाउंडेशन गोरक्षण केंद्र भंडारा येथे दाखल करून **आरोपी नामे— १) रामलाल किसना राममिना, वय ६० वर्ष, रा. देशमा ता. महालपुर राजस्थान ह. मु. निमखेडा ता. मौदा जि. नागपूर २) लखनकुमार कार्तिक रात्रे, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. निमखेडा ता. मौदा जि. नागपूर ३) रामलाल मदनलाल तुळशीकर, वय ३९ वर्ष, रा. एच. बी. टाऊन सुर्य नगर नागपूर** यांचे विरूद्ध कलम ११(१) (ड) प्रा. छळ प्रति. अधि. १९६०सहकलम ५ अ (१), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधि. १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, मा अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पो. अधिकारी कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपूत, सहायक पोलीस निरीक्षक मनोज चौधरी, पोलीस हवालदार राजू आंधळे, राजेंद्र गौतम, जीवन देवांगन, पोलीस नायक अजय वाघमारे, पोलीस अंमलदार आशिष निपाने, आशिष रडके, होमगार्ड प्रमोद मानकर यांनी केलेली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर